ऋषिपत्नी ||४७|| पतिव्रतांमाजी शिरोमणी || स्वरूपें असे लावण्यखाणी || नारदमुनि सांगोनी || गेला आतां निर्धारें ||४८|| तरी जाऊनि अत्रिआश्रमासी || तिचें सत्व हरावें निश्चयेंसी || ऐसें ऐकोनि हृषीकेशी || ब्रह्मात्रिनयन अवश्य म्हणे ||४९|| विधिरुद्रशार्ङ्गपाणी || त्रैमूर्ति एकत्र मिळोनी || अत्रिमुनीच्या सदनीं || येऊनि उभे राहिले ||५०|| द्विजरूप धरूनि जाण || उभे राहिले अंगणीं येऊन || हें अनुसूयेनें देखोन || आसन दिधलें बैसावया ||५१|| आसनीं बैसतां सत्वर || म्हणती क्षुधा लागली फार || नग्न होऊन निर्धार || इच्छाभोजन देईजे ||५२|| ऐसें ऐकोनि ते सती || विस्मय करीत बहु चित्तीं || काय बोले तयांप्रती || ऐका सादर श्रोते हो ||५३|| अवश्य म्हणोनि ते अवसरीं || गृहांत गेली हो सुंदरी || पतिलागीं निवेदन करी || नमस्कारूनि तेधवां ||५४|| ऋषि अंतरीं विलोकोनी || पाहें जंव आत्मज्ञानी || तंव चतुर्मुखरुद्रपन्नगशयनी || छळणालागीं पातले ||५५|| हें जाणोनियां मानसीं || तीर्थगंडी देई कांतेसी || गंगा प्रोक्षून तिघांसी || भोजन देई जाणपां ||५६|| तीर्थगंडी घेऊनि सत्वरीं || बाहेर आली ते सुंदरी || गंगोदक प्रोक्षण करी || त्रैमूर्तीवरी तेधवां ||५७|| गंगोदकाचा स्पर्श होतां || बाळें जाहलीं हो तत्वतां || हें देखोनि पतिव्रता || काय करी ते वेळे ||५८|| कंचुकीसहित परिधान || फेडून ठेवी न लागतां क्षण || नग्न होवोनियां जाण || बाळांजवळी बैसतसे ||५९|| बाळें घेऊनि मांडीवरी || स्तनीं लावी तेव्हां सुंदरी || पान्हा फुटला ते अवसरीं || देखोनि सती आनंदे ||६०|| तिन्ही बाळें शांत करून || पाळण्यांत निजवी नेऊन || जन्मकथा सांगोन || हालवीतसे निज छंदें ||६१|| ऐसे कित्येक संवत्सर लोटले || तंव नारद अकस्मात पातले || अत्रिमुनीनें आसन दीधलें || बैसावया नारदासी ||६२|| तंव नारद विलोकोनि पहात || ब्रह्माचतुर्भुजकैलासनाथ || हे तिन्ही बाळ खेळत || मठामाजी कौतुकें ||६३|| ऐसे देखोनि ब्रह्मसुत || मनीं जाहला हर्षभरित || आतां जाऊनि वैकुंठांत || लक्ष्मीसी सांगावें ||६४|| ऐसें विचारोनि चित्तीं || नारद निघाला पवनगती || जाऊन वैकुंठाप्रती || लक्ष्मीसी पुसतसे ||६५|| म्हणे वो आदिमाये वहिले || श्रीविष्णु कोठें गेले || ऐसें ऐकून लक्ष्मी बोले || सुतसुतासी तेधवां ||६६|| ऐक सखया विरिंचि सुता || मी नेणें विष्णूची वार्ता || ऐसे सिंधुजा सांगतां || सृष्टिकरसुत बोलतसे ||६७|| कर्मभूमीसी अतिपावन || अत्रिआश्रम आहे

जाण ।। ते ठायीं जनार्दन ।। विधिहरासह वसतसे ।।६८।। ऐसें सांगोन कमळजेप्रती ।। नारद गेला कैलासपंथीं ।। गिरिजेस सांगोन निश्चितीं ।। सत्यलोकासी जातसे ।।६९।। नारद आला हें पाहोन ।। सावित्री पुसे वर्तमान ।। म्हणे नारदा ऐक वचन ।। चित्त देऊन निर्धारें ।।७०।। नारद म्हणे सावित्रीसी ।। काय हो मजलागीं पुससी ।। येरी म्हणे चतुर्वक्त्रपंचवक्त्र हृषीकेशी ।। कोठें गेले सांगपां ।।७१।। विधिसुत म्हणे ते अवसरीं ।। सावित्री सांगतों तें अवधारीं ।। चतुर्भुजचतुर्वक्त्रद्विपंचकरी ।। मृत्युलोकीं वसताती ।।७२।। ऐसें बोलतां ब्रह्मपुत्र ।। तिघी मिळाल्या एकत्र ।। जोडोनियां पाणिपात्र ।। नारदासी विचारिती ।।७३।। पूर्वीपासोनि वृत्तांत ।। नारदा कैसा सांग त्वरित ।। येरू म्हणे ऐका त्वरित ।। चित्त देऊनि पूर्वीचा ।।७४।। अत्रिमुनीचे आश्रमासी ।। तुम्ही पाठविलें छळणासी ।। ऐसें सांगतां नारदासी ।। काय बोलिल्या तेधवां ।।७५।। अत्रि आश्रम कर्मभूमीसी ।। कोठें आहे सांग आम्हांसी ।। आम्ही जाऊं तयाठायासी ।। घेऊनि येऊं भ्रतार ।।७६।। ऐसें ऐकतां ब्रह्मसुत ।। तिघींप्रति काय बोलत ।। माझिया मागें यावें त्वरित ।। दाखवीन तुम्हांसी ।।७७।। दुरोन दाखवीन आश्रमासी ।। मी नयें हो तयाठायासी ।। ऐसें बोलोन तिघींसी ।। विधिसुत घेऊनि निघाला ।।७८।। पुढें जातसे नारदमुनी ।। मार्गें येता तिघीजणी ।। आश्रमासमीप येऊनी ।। उभा राहिला ब्रह्मसुत ।।७९।। उमासावित्रीसहलक्ष्मीसी ।। पहा म्हणे आश्रमासी ।। येरी म्हणती नारदासी ।। चल आलां मठांत ।।८०।। नारद म्हणे मी नयें आश्रमांत ।। तुम्हींच जावें यथार्थ ।। ऐसें ऐकोनियां त्वरित ।। आश्रमांत प्रवेशल्या ।।८१।। तंव ते पतिव्रता महासती ।। जिची त्रिभुवनांत जाहली कीर्ती ।। ती मांडीवरी घेऊनि त्रैमूर्ती ।। खेळवीतसे आनंदें ।।८२।। हें देखोनि उमा रमा सावित्री ।। नमस्कार घालिती धरत्रीं ।। धन्य धन्य ऋषि अत्री ।। धन्य अनुसूयासती हो ।।८३।। मग उठोनियां सत्वर ।। उभ्या राहिल्या जोडोनि कर ।। अनुसूयेनें देखोनि साचार ।। पुसती जाहली तयांतें ।।८४।। कोण तुम्हीं सांगा त्वरित ।। काय अपेक्षित असेल चित्त ।। तें सांगावें निश्चित ।। देईन जाण तुम्हां तें ।।८५।। हें ऐकोनियां निश्चितीं ।। सावित्री लक्ष्मी पार्वती ।। बोलत्या जाहल्या अनुसूयेप्रती ।। पति आम्हा तें देईजे ।।८६।। येरी म्हणे तुमचे पती ।। कोठें आहेत सांगा निश्चितीं ।। ऐसें ऐकूनि पार्वती ।। सावित्री लक्ष्मी काय बोले ।।८७।। शिव ब्रह्मा वैकुंठपती ।। माते हे जाणिजे आमुचे पती ।। तुझे घरीं

बाळें निश्चितीं ।। होऊनि क्रीडती स्वच्छंदें ।।८८।। ऐसें अनुसूयेनें ऐकूनी ।। गृहांत गेली उठोनी ।। पतिलागीं नमस्कारूनी ।। सर्व वृत्तांत सांगीतला ।।८९।। ऐकोनि तेव्हां ऋषि बोलत ।। तीर्थ गंडी नेंई त्वरित ।। गंगा प्रोक्षून पूर्ववत ।। करूनि देंई जाणपां ।।९०।। ऐसें ऐकूनि ते अवसरीं ।। तीर्थ गंडी घेत सत्वरीं ।। बाहेर येऊन झडकरीं ।। काय बोलली तिघीं ते ।।९१।। तुमचे पति निश्चित ।। खेळताती अंगणांत ।। ते घेऊनियां त्वरित ।। जावें आपुले स्वस्थाना ।।९२।। हें ऐकोनि मृडानी ।। सावित्री लक्ष्मी तिघीजणी ।। बोलत्या जाहल्या सती लागीनी ।। बोळख आम्हांसी पुरेना ।।९३।। तरी माते तूंचि जाण ।। पूर्ववत देंई बो करून ।। ऐसें तीस नमस्कारून ।। सती लागीं तेधवां ।।९४।। निरभिमानी जाहल्या चित्तीं ।। हे देखोनि अनुसूयासती ।। काय बोले तिघींप्रति ।। देतें निश्चितीं पति तुम्हां ।।९५।। मग तिणें गंगोदक प्रोक्षून ।। विधि नीलकंठ नीलवर्ण ।। त्रैमूर्ति पूर्ववत करून ।। दाखविल्या सर्वांतें ।।९६।। तंव ऋषि जाहला बोलता ।। आम्हांलागीं टाकून जातां ।। देवाधिदेवा हो काय आतां ।। त्रैमूर्तीसी बोलतसे ।।९७।। अत्रि अनुसूया ऐसें बोलती ।। हें ऐकोनि त्रैमूर्ती ।। बोलते झाले ऋषिप्रती ।। आम्हांसी येथूनी न जाववे ।।९८।। तंव अकस्मात नारद पातला ।। श्रीविष्णूसी नमस्कार केला ।। म्हणे आतां त्रैमूर्ती एक जाहलां ।। दाखवा कोठें सत्वरूप ।।९९।। माझें पूर्वपुण्य फळा आलें ।। त्रिगुणात्मक ऐक्य जाहलें ।। हें ऐकोनि देव बोलिले ।। नारदासी तेधवां ।।१००।। तुम्हीं पूर्वी प्रयत्न केला अमुप ।। योगयागादि तप ।। तरी पाहें पां आजि सत्वस्वरूप ।। डोळे भरी नारदा ।।१।। तो दिवस परम पावन ।। ऐका त्याचें नामाभिधान ।। सांगतसें सविस्तर पूर्ण ।। चित्त देवोनि ऐकावें ।।२।। मासांमाजी मार्गेश्वर ।। उत्तम महिना प्रियकर ।। तिथींमाजी तिथि थोर ।। चतुर्दशी शुद्ध पें ।।३।। वार बुधवार कृत्तिका नक्षत्र ।। ते दिनीं ब्रह्मा विष्णु त्रिनेत्र ।। तिघे मिळोनि एकत्र ।। शुद्ध सत्व निवडिलें ।।४।। त्रैमूर्तीचें सत्व मिळोन ।। मूर्ति केली असे निर्माण ।। ठेविते झाले नामाभिधान ।। दत्तात्रेय अवधूत ।।५।। हा सोहळा देखोनि अनुसूयासती ।। हर्षभरित जाहली चित्तीं ।। म्हणे परब्रह्म सत्वमूर्ती ।। दृष्टीं पडली आज हो ।।६।। धन्य धन्य भाग्य आजिचें ।। निधान देखिलें त्रिभुवनींचें ।। फळ पावलें पूर्वपुण्याचें ।। जन्मोजन्मींचें तेधवां ।।७।। तंव इंद्रादिक सुरवर ।। येते जाहले सत्वर ।। करूनि साष्टांग नमस्कार ।। उभे राहिले बद्धांजली ।।८।। पूजा करूनि

षोडशोपचार ।। उभे राहिले जोडोनि कर ।। नारद तुंबर गंधर्व किन्नर ।। गायन करिती एकसरें ।।९।। यथाविधि पूजा करून ।। स्तुति करी ब्रह्मनंदन ।। तैसाचि तो सहस्त्रनयन ।। स्तवन करी प्रीतीनें ।।११०।। जयजयावो अत्रिनंदना ।। जयजयावो कृपाघना ।। जयजयावो मधुसूदना ।। पूर्णब्रह्मसनातना तूं ।।११।। जयजयावो करुणाकरा ।। जयजयावो दयासागरा ।। जयजयावो कृपाकरा ।। त्रिगुणात्मकदयाब्धी ।।१२।। जयजयावो निर्विकारा ।। जयजयावो अत्रिकुमरा ।। तूं परात्पराचा सोयरा ।। भवतारक भवाब्धी ।।१३।। जंव तुमची कृपा होत ।। तंव मूक तो होय पंडित ।। तयासि काय न्यून पदार्थ ।। त्रिभुवनींही असेना ।।१४।। गुरुकृपा होतां पूर्ण ।। तयासि होय ब्रह्मज्ञान ।। हें पुराणांतरीं वचन ।। ब्रह्मादिक बोलती ।।१५।। ऐसी स्तुति जंव करीत ।। तंव प्रसन्न जाहला कृपाघन दत्त ।। देता जाहला अपेक्षित ।। वरदान तेधवां ।।१६।। कोणी करील आराधना ।। उपासना विधियुक्तपूर्ण ।। तयेठायीं रात्रंदिन ।। मी राहीन जाण नारदा ।।१७।। दत्तात्रय नामें करून ।। कोणी करितां माझें स्मरण ।। तात्काळ उभा राहीन ।। सहस्त्र नयना जाणपां ।।१८।। जो प्रातःकाळीं नित्यनेम ।। दत्त दत्त उच्चारी नाम ।। तयालागीं मी सकाम ।। भेट देईन निर्धारें ।।१९।। कोणतेही रूपें करून ।। द्वादशमास भरतां पूर्ण ।। तयालागीं मी भेटेन ।। हे वचन सत्य सत्य ।।१२०।। उपासना विधियुक्त करोनी ।। गुरुवचनीं विश्वास ठेवोनी ।। जो रात्रंदिन माझे ध्यानीं ।। लक्ष लावील नारदा ।।२१।। तयालागीं मी एक क्षण ।। नारदानजाय कोठें टाकोन ।। प्रातःकाळीं तयालागून ।। भेट देईन प्रत्यक्ष ।।२२।। ऐसें देतां वरदान ।। आनंदला ब्रह्मनंदन ।। सुरादिक सहस्त्र नयन ।। हर्षभरित जाहले ।।२३।। करूनिया जयजयकार ।। सुमनें वर्षती सुरवर ।। विमानारूढ शचिवर ।। जाता झाला स्वस्थाना ।।२४।। ऐसा दत्तात्रेय जन्म पूर्ण ।। ऐकती पढती रात्रंदिन ।। तयांसि मी नि जांगें करून ।। रक्षीन रक्षीन त्रिवाचा ।।२५।। हा ग्रंथ गृहामाजी असावा ।। नित्य नेमेंस प्रेमें पूजावा ।। देवपूजेमाजी ठेवावा ।। आदरें करूनि समस्तें ।।२६।। त्याची फळ श्रुति हेचि पूर्ण ।। ऐश्वर्य चढे रात्रंदिन ।। यश कीर्ति सदा कल्याण ।। प्राप्त होय तयासी ।।२७।। स्वामी कृपेचा हा ग्रंथ ।। वरी दाशरथीचा आशीर्वाद यथार्थ ।। त्याचे चरणीं मस्तक ठेवित ।। मनी माधव निज प्रेमें ।।१२८।।

।। इतिश्री दत्तजन्म संपूर्णमस्तु ।। शुभं भवतु ।।

# श्रीगुरुदत्तात्रेय नमस्कार स्तोत्रं

श्रीगणेशाय नमः ।। अथ श्रीगुरुदत्तात्रेय नमस्कार स्तोत्र प्रारंभः ।। सदा प्रार्थितों श्रीगुरूच्या पदांसी ।। धरितों शिरीं वंदितों आदरेंसी ।। धरूनि करीं तारिंया बाळकासी ।। नमस्कार हा स्वामि दत्तात्रयासी ।।१।। मति हीन मी दीन आहें खरा हो ।। परी दास तुझा करीं पाखरा हो ।। जसें लेंकरुं पाळिते मायकुशीं ।। नमस्का० ।।२।। लडिवाळ मी बाळ अज्ञान तुझा ।। गुरूवांचूनि पांग फेडील माझा ।। तुझ्याविण दूजा कोण आहे अम्हांसी ।। नमस्कार० ।।३।। पितामायबंधूसखा तूंचि देवा ।। मुलेंमित्र सारे सोयरे व्यर्थ हेवा ।। कळोनि असें भ्रांति होई अह्मांसी ।। नमस्कार० ।।४।। चरित्रें गुरूचीं करी नित्य पाठ ।। जया भक्ति लागे पदीं एकनिष्ठ ।। तयाचे कुळीं दीप सज्ञान राशी ।। नमस्कार० ।।५।। वसे उंबरा सन्निध सर्वकाळ ।। जनीं काननीं घालवी नित्यकाळ ।। तया सद्गुरूचें नाम कल्याण राशी ।। नमस्कार०।।६।। श्रमोनी गुरु पाच्छितो लेच्छ आला ।। तया स्कोटरो गुंतुनि मुक्त केला ।। कृपेनें तसें स्वामिपळीं अम्हांसी ।। नमस्कार० ।।७।। सती अनुसूया सुधी आदिमाता ।। त्रयीमूर्ति ध्यानीं-मनी नित्य गातां ।। हरे रोग पीडा दरिद्रासि नाशी ।। नमस्कार० ।।८।। करोनि मनीं निश्चयो अष्टकाचा ।। जनांनों करा पाठ दत्तात्रयाचा ।। करी माधवाच्या सुता दासदासीं ।। नमस्कार हा स्वामि दत्तात्रयासी ।।९।।

।। इति श्रीगुरुदत्तात्रेय नमस्कार स्तोत्रं संपूर्णम् ।।

संकलन : **साईचरणकण**

# उत्तम पुरुष

संत माऊली ज्ञानेश्वर महाराजांनी, श्री मद्भगवद्गीतेतील भक्तियोग ज्ञानेश्वरीत सांगून, ज्ञान-भक्तीचा मळा फुलविला. सर्वसामान्यांना आकलन व्हावे म्हणून ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वर महाराजांनी काव्याबरोबरच बोलीभाषेचा अनुरूप उपयोग करून तिचे सौंदर्य वाढविले. ज्ञानेश्वर महाराजांनी सोळाव्या अध्यायात ज्ञानी पुरुषाचे निर्भयता, अंत:करणशुद्धी, ज्ञान व योग या दोहोंमधील दृढस्थिती, दान, इंद्रिय-निग्रह, यज्ञ, स्वाध्याय, तप, सरळपणा, अहिंसा, सत्यवचन, क्रोध नसणे, त्यागी, शांती, परनिंदावर्ज्य, प्राणिमात्रांविषयी दया, निर्लोभवृत्ती, मृदूता, तेजस्वीपणा, क्षमा, धीर बाळगणे, द्रोह न करणे, अहंकार न ठेवणे इत्यादी दैवी गुण सांगितले आहेत. ज्ञानी पुरुषाच्या आध्यात्मिक प्रगतीकरिता सांगितलेल्या ह्या जणू पायऱ्याच आहेत.



'अभय आणि सत्त्वसंशुद्धी' ह्या दैवी गुणांना ज्ञानेश्वर महाराजांनी अगदी सर्वोच्च स्थान दिले आहे. ह्या गुणांचे वर्णन ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायातील अकरा ओव्यांत केले आहे. ज्ञानी पुरुषाच्या जीवनात 'अभय' या गुणाला अत्यंत महत्त्व आहे. श्रीमद्भगवद्गीतेत विश्वरूपदर्शन घडविताना अर्जुनाला श्रीकृष्ण सर्वत्र 'मी'च व्यापून राहिलो आहे, असे सांगतात. म्हणजेच, सर्वत्र 'मी'च, म्हणजे आत्म्याचाच वास आहे, ही जाणीव झाली की, द्वैतपणाची भावना ढासळून पडते; आणि एकदा का द्वैतपणाची भावना उन्मळून पडली की, दुजेपणाचा, परकेपणाचा भाव, अलगतेचा, भिन्नतेचा, मी-तूपणाचा भेद येथे समूळ लोप पावतो. सगळीकडे 'मी'च आहे चा दृष्टांत झाला की, वेगळेपणा मुळी शेष राहतच नाही. अद्वैतामुळे आपले स्वतंत्र अस्तित्वच राहत नाही. सर्वत्र आपणच आहोत, असे दिसू लागते. अशी जर स्थिती आहे, तर भय कुणाचे म्हणून बाळगावे ? असे 'अभय' या गुणाचे वर्णन करताना ज्ञानेश्वर महाराज पुढे सांगतात की, महापुरात उडी घेतलीच नाही, तर बुडण्याची भीती उरी का बाळगावी ? पथ्य पाळून जीवन व्यतीत करणाऱ्याने रोगाचे भय का धरावे ? अशाप्रकारे, ज्ञानी पुरुषाने निर्भय असले पाहिजे; कारण तो कुणाच्याही आश्रयावर अवलंबून नसतो. सर्वांच्या अंतर्यामी असलेला परमेश्वर माझ्याही हृदयात आहे व तोच माझी काळजी वाहणार आहे, मग चिंता कशाला ? ही भावना त्याने सदैव मनी जपली पाहिजे. सर्वत्र 'मी'च वास करीत आहे, ही भावना मनाशी बाळगून त्याने सतत निर्भय, दृढ व निश्चल राहिले पाहिजे. हा बिनघोरपणा म्हणजेच ज्ञानी पुरुषाच्या अंगी असलेला 'अभय' हा दैवी गुण होय !

अध्यात्माकरिता सर्वसामान्यपणे संसाराची भीती बाळगली जाते; परंतु ती निरर्थक आहे. संसारात राहूनही परमार्थ साधता येतो, हेही येथे सूचित केलेले आहे.

'सत्त्वसंशुद्धी' या दुसऱ्या प्रमुख लक्षणाचे वर्णन करताना ज्ञानेश्वर महाराज सांगतात की, 'सत्त्वसंशुद्धी' म्हणजे, अंत:करणशुद्धी, पूर्ण सात्त्विक वृत्ती, आपल्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान ! समाजसंस्थेत वावरताना आपण रज आणि तम गुणांनी युक्त असतो. ज्ञानी पुरुषांनी अशाप्रकारच्या बऱ्या-वाईट कर्मांच्या पलीकडे जावून, इंद्रियांवर संयम राखून आपल्या खऱ्या अस्तित्वाची, आत्मस्वरूपाची ओळख करून घेतली पाहिजे. येथे 'सत्त्वसंशुद्धी'ची नेमकी अवस्था समजाविताना ज्ञानेश्वर महाराज प्रतिपदा व अमावास्येच्या चंद्राचा व नदीच्या सहजरूपाचा उपमा-दृष्टांत देऊन सांगतात की, याप्रमाणेच ज्ञानी पुरुषाने आपले जीवन निरंतर सात्त्विक, चारित्र्यसंपन्न व पवित्र राखले पाहिजे. त्यात कुठलीही बाधा येऊ देता कामा नये; ना लोभाची, ना मोहाची ! सात्त्विक मनोवृत्तीची अखंड जपणूक केली पाहिजे. म्हणजेच रज व तम गुणांचा लेशमात्रही राहता कामा नये. अध्यात्मातील परमोच्च अवस्था प्राप्त करायला हे गुण उत्तम पुरुषाला सहाय्यभुत ठरतात; आणि ही अवस्था साधल्यावर ज्ञानी पुरुषाला मुक्तीचे दालन खुले होते.

**– साईचरणकण**

# नाम आणि प्रारब्ध

- सौ. गीता गोविंद कुंटे, मुलुंड (पूर्व), मुंबई.

प्रारब्ध म्हणजे काय ? तर मागच्या जन्मी केलेल्या व आता न समजणाऱ्या कर्मांचा भोग. आपण त्याला नशीब म्हणू हवं तर ! परंतु हा भोग, हे प्रारब्ध कोणालाही चुकत नाही, ते भोगावेच लागते. सीता एवढी साध्वी असून तिला वनवास भोगावा लागावा ना ! याला काय म्हणणार, तिचा भोगच ना ! हा भोग श्रीकृष्णालाही टाळता आला नाही. शिष्टाईसाठी तो दुर्योधनाकडे गेला होता. परंतु दुर्योधनाने त्याचे ऐकले नाही व कौरव-पांडवांचे भीषण युद्ध झाले, हे सर्वश्रुतच आहे. राजा हरिश्चंद्रही आपला भोग टाळू शकला नाही. केवढे कष्ट त्याच्या कुटुंबाला भोगावे लागले ! हे वाचल्यानंतर आपल्यालाही वाईट वाटते. हे आपण मागच्या जन्मी ठेवलेले गाठोडे आपल्याला या जन्मी सोडावे व भोगावे लागतेच.

आता अगदी सामान्यच गोष्ट पहा ! एखादे दिवशी चांगला केलेला पदार्थ आपण आपल्या माणसासाठी काढून ठेवतो. पण जर तो त्याच्या नशिबात नसेल, तर दुसराच कोणीतरी तो खाऊन जातो. ''दाने दाने पे लिखा है खानेवाले का नाम'', हेच खरे ! पण आपण अशी समजूत घालून घेतो की, त्याच्या नशिबातच नव्हते; त्याला आपण काय करणार ? दोन माणसांचे प्रारब्ध जेव्हा एकमेकांशी जोडलेले असते, तोपर्यंत ती माणसे एकमेकांकडे जात-येत असतात; पण जेव्हा त्यांचे कर्मभोग संपतात, तेव्हा काहीतरी छोटे कारण होते किंवा काहीही कारण नसताना ती एकमेकांपासून विलग होतात. एकमेकांकडे जाणे-येणे काय, बोलणेही सोडून देतात. एखादा माणूस अगदी फार छान वागतो, त्याचे आचरणही वाखाणण्यासारखे असते, तरी त्याला सतत दुःखाला सामोरे जावे लागते. याला काय कारणपरंपरा आहे ? तर, हे त्याचे प्रारब्ध होय ! ज्याचे उत्तर आपण कितीही विचार केला तरी मिळत नाही, पण तो भोग मात्र भोगावाच लागतो, तो चुकत नाही.

### प्रारब्ध भोग

प्रारब्धाचे भोग भोगणे कठीण
नामाची ठेवा तिथे आठवण ॥
प्रारब्धाचे भोग कोणा न चुकले
राम-कृष्णही भोगून गेले ॥
प्रारब्धाचे भोग अति कठीण
मुखी ठेवा सतत नामस्मरण ॥
रोगासाठी औषधाचे प्रयोजन
भोगासाठी नामाचे आयोजन ॥
प्रारब्धाचे भोग कधी न टळती
नामाने ते शीतल होती ॥
नामस्मरण करीत जाणे
जीवनसाफल्य होईल त्याने ॥

प्रारब्ध भोग जर कोणालाही टाळता येत नाही, तरमग नामस्मरणाचा काय संबंध ? तर, नाम आणि प्रारब्ध यांचा अन्योन्य संबंध आहे. भोग भोगताना आपल्याला अत्यंत कष्ट, दुःख सोसावे लागते. ते सुसह्य होण्यासाठी नामाचा उपयोग होतो. नामस्मरण करणारा मनुष्य भोगही आनंदाने भोगू शकतो. नामात गुंतल्यानंतर त्याचे देहभान हरपते, मग दुःखाची जाणीवच त्याला होत नाही. सतत नामस्मरण करीत राहिले, तर या प्रारब्धावर त्याचे दडपण येते व त्याची तीव्रता कमी होते. त्यामुळे त्याचा त्रासही कमी होतो. नामस्मरण म्हणजे, ईश्वराची आराधना. जर आपण ईश्वरावर पूर्ण विश्वास ठेवला, तर आपल्याला भिण्याचे अगर दुःख अथवा काळजी करण्याचे काय प्रयोजन ? ईश्वर नेहमी आपल्या हिताच्याच गोष्टी करीत असतो. आपले हित त्यालाच जास्त कळते, हा विश्वास असल्यावर भिण्याचे कारणच काय ? जी व्यक्ती नामस्मरण मनापासून व श्रद्धा ठेवून करते ती व्यक्ती आपले भोग आनंदाने, त्याची जाणीवही न होता भोगते. अर्थात्, नामस्मरण केल्याशिवाय याचा प्रत्यय येणार नाही. औषध घेतल्याशिवाय रोग बरा होत नाही. आपण प्रारब्ध टाळू शकत नाही, ते तर भोगावेच लागते. तर, त्यावरचे औषध म्हणजे 'नामस्मरण' केले पाहिजे. नवविधा भक्तीमध्ये नामस्मरण हे सोपे व सहज-सुलभ साधन अनेक संतांनी सांगितले आहे. त्याची प्रचिती त्यांच्या चरित्रांवरून आपल्याला येते. तर, आपणही तोच मार्ग का न अनुसरावा ? म्हणून, आता एकच निश्चय करा की, नामस्मरण केल्याशिवाय मी राहणार नाही. जेवताना-झोपताना-उठताना-काम करताना नामस्मरण करण्याची सवय ठेवा, म्हणजे आपोआप ते होत जाईल व आपले जीवन सुखमय होईल.

बोध कथा

# माणूस बदलला !

– ह. ल. रानडे, सातारा.

चोथेसाहेब चांगलेच तल्लख बुद्धीचे, मजबूत बांध्याचे, करड्या नजरेचे व कडक शिस्तीचे. म्हणून तर त्यांची सेनेमध्ये कमिशन्ड ऑफिसर म्हणून निवड झाली. शिवाय त्यांचा कामाचा उरक व झपाटा अगदी वाखाणण्याजोगा होता. एवढेच नव्हे, तर सर्वच कामे ती अगदी मनापासून व वेळेवर करणे, ती केल्यावर तपासून पहाणे व मगच वरिष्ठांना ती सादर करणे वगैरेंबाबत त्यांचा फारच कटाक्ष होता. त्यामुळे त्यांचे वरिष्ठ त्यांच्या कामावर खूष असत. चोथेसाहेबांनी काम केले म्हणजे ते तपासून पहाण्याची मुळीच जरूर नाही, असा नावलौकिकपण त्यांनी मिळवला होता. ते स्वत:च असे दक्षतेने काम करत असल्यामुळे त्यांच्या हाताखालील नोकरांनी काम व्यवस्थित केले नाही की, ते खूप चिडत, संतापत व त्या भरात समोरच्या माणसाचा मुलाहिजा न ठेवता त्याला अपमानीतसुद्धा करत. कार्यालयातसुद्धा ते अगदी वेळेवर येत असल्यामुळे एखाद्याला कार्यालयात येण्यास उशीर झाला की, ते त्याला फडाफडा बोलत असत. एवढेच नव्हे, तर त्या दिवसाची किरकोळ रजा घ्यावयास लावत. कामात चुका झाल्या की दंड (Fine) करण्याससुद्धा ते कचरत नसत. ''आमच्या पाठीवर मारा, पोटावर मारु नका,'' अशा विनवण्या करूनही ते त्याकडे दुर्लक्ष करीत व केलेला दंड माफ करत नसत.

रजा देण्याबाबत तर त्यांची फारच खळखळ. "LEAVE IS TO BE REFUSED FIRST." हा त्यांचा खाक्या. किरकोळ रजा जी असते ती कधीच संपवावयाची नसते, तर ती अगदीच जरूर लागली तर व आपत्कालीन (EMERGENCY) कामाच्या वेळीच द्यावयाची असते, अशी त्यांची किरकोळ रजेबाबत विचारसरणी असल्यामुळे त्यांच्याकडून एक-दोन दिवसांची किरकोळ रजा मंजूर करून घेणे म्हणजे एक दिव्यच होते. चोथेसाहेबांच्या कामाच्या एकंदर खाक्यामुळे त्यांच्या हाताखाली काम करायला लोक कंटाळले होते व त्यांची बदली केव्हा होते याची वाटच पहात होते. परंतु, त्याबाबत वरिष्ठांकडे तक्रार करूनपण उपयोग नव्हता; कारण वरिष्ठांना त्यांचे काम पसंत होते.

एकदा असे झाले की, चोथेसाहेबांच्या हाताखाली काम करणारे हेडक्लार्क यशवंतराव यांची आई आजारी असल्याची व तिला चांगल्या औषधपाण्याची योजना करण्यासाठी त्या गावाहून त्वरित घेऊन जाण्याबद्दलची तार आली. तेव्हा यशवंतरावांनी ती तार चोथेसाहेबांना दाखवून तीन दिवसांची किरकोळ रजा देण्याची विनंती केली व त्याच दिवशी सायंकाळची साडेसहाची ट्रेन पकडणे शक्य व्हावे म्हणून कार्यालय तासभर आधी सोडण्याची परवानगीपण मागितली. वास्तविक, हेडक्लार्कच्या आईच्या आजारपणाची व तिला तेथून त्वरित हलविण्याची तार पाहिल्यावर चोथेसाहेबांनी लगेच त्या अर्जावर 'रजा मंजूर' म्हणून शेरा मारावयास पाहिजे होता. पण तसा ते मारते तर ते चोथेसाहेब कसले ! तार पाहूनसुद्धा त्यांचे कठोर अंत:करण मुळीच द्रवले नाही. उलट, तुमची आई खरीच आजारी आहे का ? तिला लगेचच आणावयास हवे का ? तिचे वय काय ? तुमची ही तार खरी असल्याचा पुरावा काय ? का रजा मिळविण्यासाठी तुम्ही ही खोटी तार तुमच्या नातेवाईकांना करावयास सांगितली वगैरे अनेक गैरलागू, चीड आणणारे व दु:खावर डागण्या देणारे प्रश्न साहेबांनी उपस्थित केले. त्यामुळे यशवंतराव मनोमन खूपच संतापले व साहेबांच्या टेबलावर रजेचा अर्ज फेकून निघून जावे, असे त्यांच्या मनात आले; पण त्यांनी आपला राग आवरला; कारण रागावून काहीच उपयोग नव्हता. उलट, आपण तोल सोडून जर काही बोललो, तर साहेबांचा अवमान (Insult) केल्याबद्दल साहेब बेशिस्त वर्तनाबद्दल Disciplinary Action पण घेण्याची शक्यता असल्यामुळे ते चोथेसाहेबांना अगदी विनवणीच्या

स्वरात, डोळ्यांत अश्रू आणून म्हणाले, ''साहेब, खरोखरीच माझी आई आजारी असली पाहिजे व ही तार मुळीच खोटी नाहीये. ती आता वयस्कर झाली आहे व मला भेटण्याची तिला तीव्र इच्छा असल्यामुळेच तिच्या सांगण्यावरून माझे मित्र दत्तपंतराव यांनी ही तातडीची तार केली आहे. आता, मी जर लगेच गेलो नाही तर कदाचित माझी व तिची भेटपण होऊ शकणार नाही आणि ही गोष्ट जन्मभर मला खात राहील. म्हणून मेहेरबानी करा व मला तीन दिवसांची रजा द्या. मी तीन दिवसांच्या पुढे रजा मुळीच वाढवणार नाही.''

एवढ्या काकुळतीने बोलल्यावर चोथेसाहेबांनी यशवंतरावांना फक्त दोन दिवसांची रजा मंजूर केली. कारण त्यांच्या मते आईला भेटण्यासाठी व तिला इकडे आणण्यासाठी दोन दिवस अगदी पुरेसे होते. त्या दिवशी कार्यालय लवकर सोडण्याची परवानगी मात्र साहेबांनी साफ नाकारली. ते म्हणाले, ''तुम्ही ऑफिस सुटल्यावर जरा चपळाई केलीत तर तुम्हाला रेल्वे सहज गाठता येईल.'' हेडक्लार्क मुकाट्याने आपला डोळा चुकवून लवकर कार्यालय सोडत नाहीत ना, हे पाहण्यासपण चोथेसाहेब विसरले नाहीत.

कार्यालय सुटल्यावर हेडक्लार्क यशवंतराव आपली सायकल वेगाने दामटत घरी पोचले. हाती लागतील ते चार कपडे त्यांनी पिशवीत कोंबले, पण बसने गेल्यास ट्रेन सापडणे कठीण जाईल असे वाटल्यावरून त्यांनी त्याच्या शेजारी मित्रास सर्व हकीकत सांगून त्यांच्या स्कूटरने आपल्याला स्टेशनवर सोडण्याची विनंती केली. ट्रेन गाठण्याची निकड समजताच शेजाऱ्याने आपली स्कूटर लगेचच बाहेर काढली व मग दोघेजण स्टेशनच्या दिशेने वेगाने निघाले. गाडी साधारणपणे पाच-दहा मिनिटे उशिरा येते आणि म्हणून ती आपणास नक्की मिळेल, असे दोघांना वाटले. पण दुर्दैवाने त्याच दिवशी त्यांना फक्त पाच मिनिटे उशीर होऊनसुद्धा, गाडी अगदी वेळेवर सुटल्यामुळे मिळू शकली नाही. आता काय करायचं म्हणून यशवंतरावांपुढे मोठ्ठाच प्रश्न आ वासून उभा राहिला; कारण आता त्यांना त्यांच्या गावी जाण्यास दुसऱ्या दिवशी ११ वाजेपर्यंत गाडीच नव्हती. त्यामुळे यशवंतराव अगदी भांबावून गेले; पण संधी मिळेल तेव्हा दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची वृत्ती यशवंतरावांच्या शेजाऱ्याची असल्यामुळे त्याने त्यातून मार्ग काढला. तो म्हणाला, ''गाडी जाऊन फक्त पाचच मिनिटे झाली आहेत. आपण जर वेगाने गेलो तर आपल्याला ती गाडी पुढच्या स्टेशनवर गाठता येईल. तेव्हा, बसा मागे माझ्या स्कूटरवर. आता वेळ घालवून उपयोग नाही'', असे म्हणून दोघेही पुढील स्टेशनवर ट्रेन गाठण्याच्या ईर्षेने प्रवास करू लागले. रेल्वे-रस्ता व स्कूटरचा रस्ता जवळजवळ समांतरच जात असल्यामुळे पंधरा-वीस मिनिटांत त्यांना लांबून ट्रेन दिसू लागली व आता आपण जर स्कूटरचा वेग वाढवला तर ट्रेन नक्की मिळू शकेल, असे त्या दोघांना वाटले, पण पुढील स्टेशन येईपर्यंत दोघांना खात्री वाटत नव्हती. कारण काही अंतर गेल्यावर मधून मधून ते थोडे पुढे, तर गाडी मागे, तर नंतर गाडी पुढे, तर हे मागे अशी काही वेळ जीवघेणी स्पर्धा चालू होती. पण शेवटी यशवंतरावांचे नशीब बलवत्तर व शेजाऱ्याची ट्रेन गाठून देण्याची जिद्द, यामुळेच गाडी पुढील स्टेशनात जाण्यापूर्वीच ते त्या स्टेशनवर पोहोचले व त्या गाडीत एकदाचे जाऊन बसले. गाडी मिळू नये म्हणून कार्यालयातून लवकर न सोडणारा माणुसकीरहित आपला साहेब कोणीकडे व जीवाची पर्वा न करता स्कूटरवरून तुम्हाला पुढच्या स्टेशनवर गाडी पकडून देतो, असे स्वतःहून म्हणणारा दयार्द्र अंतःकरणाचा शेजारी कोणीकडे, हे पाहून यशवंतरावांना अगदी गहिवरून आले व ते शेजारी मित्राला म्हणाले, ''तुम्ही धोका पत्करून केवढे मोठे माझे काम केलेत! तुमचे आभार मानण्यास मजजवळ शब्द नाहीत. तुमचे हे उपकार मी कधीच विसरू शकणार नाही.''

यशवंतरावांची गाडी अगदी वेळेवर पोचली. घरी पोचताच यशवंतरावांना कळले की, आईने आपला धोशा घेतला आहे. तेव्हा ते तडक आईच्या बिछान्याजवळ गेले व त्यांनी आनंदाने तिला घट्ट मिठी मारली. मुलगा भेटल्याचा आनंद आईच्या गगनात मावेना. तिने आनंदाश्रूंनी यशवंतरावांना न्हाऊच घातले. थोड्या वेळाने ती म्हणाली, ''अरे, मी आजारी पडल्यापासून मला वाटायला लागलं की आता आपलं काही खरं नाही,

अन् म्हणून तुला एकदा भेटावं, असं मी गेले पाच-सहा दिवस म्हणतेय. तू भेटलास, फार छान वाटलं बघ! अरे, डॉक्टरपण आज सकाळी म्हणाले की, तुमच्या मुलाच्या गावी जा व तेथे आणखी चांगली औषधयोजना करून घ्या! तुम्हाला कुठलाही रोग वगैरे झालेला आढळला नाही. तेव्हा तुम्ही आता काहीच काळजी करू नका; पण काळजी मात्र घ्या!

डॉक्टरांनी आईला चांगली औषधयोजना करण्यासाठी आपल्या गावी घेऊन जाण्याची परवानगी दिल्यामुळे यशवंतराव आनंदले व तेथे एक दिवस मुक्काम करून दुसऱ्या दिवशीच स्पेशल टॅक्सी करून त्यांनी आईला घरी आणले. हवापालट व नवीन औषधयोजना लागू पडल्यामुळे यशवंतरावांच्या आईच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा होऊ लागली व ती आपले दैनंदिन कामकाज व्यवस्थित करू लागली.

यानंतर जेमतेम एक महिनाच लोटला असेल. यशवंतराव त्या दिवशी कार्यालयात गेल्या-गेल्याच तारवाला साहेबांच्या नावाची तार घेऊन आला. ती तार पाहून यशवंतराव घाबरलेच. कारण ती तार "MOTHER EXPIRED. START FIRST TRAIN", या मजकुराची होती. यशवंतराव तडकच तार घेऊन साहेबांकडे गेले. यशवंतरावांच्या हातात तार पाहताच साहेब ओरडले, ''आज तुम्हारा कौन मर गया?''. ते ऐकून यशवंतराव चिडून म्हणाले, ''हमारे यहाँ कोई नहीं मरा। लेकिन तुम्हारी माँ चल बसी और तुम्हें जल्दी बुलाया है। देखो, यह आपका टेलिग्राम है। पढ़ो।'' तार वाचून चोथेसाहेब चांगलेच हबकले व ढसढसा रडू लागले. त्यांच्यातला माणूस आपली आई म्हटल्यावर जागृत झाला व ते हुंदके देत सांगू लागले, ''माझी आई जवळजवळ गेले महिनाभर आजारी होती व तिला मला भेटण्याची खूप इच्छा होती. यापूर्वीच तिला भेटण्यासाठी जावयास हवे होते; पण मी तिकडे दुर्लक्षच केले. त्याचा परिणाम म्हणजे माझी व माझ्या आईची शेवटची भेटपण होऊ शकली नाही. माझी आठवण करीत करीतच तिने प्राण सोडला असला पाहिजे. किती कमनशिबी मी! माझ्या आईची मला भेटण्याची इच्छापण मी पूर्ण करू शकलो नाही'', असे बोलून चोथेसाहेबांनी टेबलावर डोके ठेवले व ते अगदी अस्वस्थ झाले. त्याचवेळी त्यांना यशवंतरावांची आई आजारी असल्याबद्दलची तार आली तेव्हाचा प्रसंग त्यांच्या डोळ्यासमोर उभा राहिला व त्या दिवशी यशवंतरावांना रजा मंजूर करण्याच्या वेळी आपण त्यांना दिलेल्या गैरवागणुकीची प्रकर्षाने आठवण झाली व ते यशवंतरावांना म्हणाले, ''तुम्ही खूप नशीबवान आहात; कारण तुमची व तुमच्या आईची भेट तरी होऊ शकली. पण तुमची आई आजारी असल्याची तार जेव्हा आली तेव्हा रजा मंजूर करतेवेळी मी तुम्हाला जी वागणूक दिली त्याची मला आता लाज वाटत आहे. तुमची तारसुद्धा मी खोटी मानली व आत्ताच जाण्याची जरूरी आहे काय वगैरे विचारावयास नको त्या गोष्टी मी तुम्हाला विचारल्या, त्याची सजा म्हणूनच की काय माझी आई मला भेटल्याशिवाय स्वर्गवासी झाली. मला तरी नक्की असेच वाटते. त्यावेळी माणुसकी सोडून मी जे तुम्हाला बोललो त्याबद्दल मला आता खूप पश्चात्ताप होतोय. हेडक्लार्कसाब, मैं तुम्हारी माफी मांगता हूँ!'' असे म्हणून चोथेसाहेब खुर्चीवरून उठले व यशवंतरावांना मिठी मारून ते पुन: म्हणाले, ''मी फार मोठा गुन्हा केलाय. त्यामुळे माझी आई मला न भेटताच देवाघरी गेली. हीच भगवंताने मला शिक्षा केलीय. मी चुकलो. मला तुम्ही खरोखरीच क्षमा करा.'' यशवंतरावांनी त्यांना शांत केले व ते म्हणाले, ''मी ती गोष्ट केव्हाच विसरून गेलोय. तुम्ही माझे वरिष्ठ आहात. तुम्ही माझी कसली क्षमा मागता? तुम्ही आताच तुमच्या गावी निघा! म्हणजे तिचे अंत्यदर्शन तरी तुम्हाला घेता येईल.''

ही एकच घटना चोथेसाहेबांच्या जीवनात त्यांचा स्वभाव परिवर्तन करणारी ठरली. कडक शिस्तीचे, निष्ठुर स्वभावाचे माणुसकी नसलेले, दुसऱ्याचे कधीच ऐकून न घेणारे चोथेसाहेब त्या घटनेनंतर कोमल अंत:करणाचे, शांत स्वभावाचे, माणुसकी जागृत ठेवणारे व दुसऱ्यांचा विचार करणारे असे बनले. त्यांच्या पूर्वपरिचित माणसांना तर हा फरक बुचकळ्यात टाकणाराच वाटला. वाघ गोगलगाय बनला.

❑❑❑

# साईवंदना

## साईनाममहिमा

नाम ज्याचे मुखी साई,
त्यास काळभय नाही।
उद्धरूनी सहजी जाई,
नाम साईचे घेता ॥१॥

नाम घ्यावे श्रद्धा ठेवून,
तरीच पावती साई जाण।
श्रद्धा नसल्या सारे क्षीण,
न येई फळ हाता ॥२॥

नाम घ्यावे अपेक्षेवीण,
साई जाणती सर्व जाण।
भार त्यांचेवरी ठेवून,
शुद्ध भाव असो चित्ता ॥३॥

साई नाम कल्पतरू,
भव सागरीचे तारू।
नेई सहजी पैलतीरू,
साई हात देती भक्ता ॥४॥

नाम आर्ततेने घेई,
त्यांचे पाठी उभा साई।
साई केवळ शेषशायी,
भक्त प्रतिपालनकर्ता ॥५॥

■ **वसंत गोडबोले,**
१२४, शनिवार पेठ (नेने घाट),
पुणे - ४११ ०३०.

## अनाथांचा नाथ साई

नाथांचा तो नाथ माझा शिरडीचा साईनाथ हो
झालो पावन तवचरणी घडली सर्व तीर्थे शिरडीत एक साथ हो

काशी विश्वेश्वर तुज म्हणू की म्हणू बद्रीचा बद्रीनाथ हो
पाहता भोळ्या शंकरास लोचनी,
मुखी वदली शिरडीचा भोलेनाथ हो
नाथांचा तो नाथ माझा शिरडीचा साईनाथ हो

अयोध्येचा राम कधी दिसशी,
कधी दिसशी मथुरेचा राधेशाम हो
विष्णुचे ते रूप साजिरे
मज दिसले साई दरबारात हो
नाथांचा तो नाथ माझा शिरडीचा साईनाथ हो

साईंच्या मी रूपात पाहिले
बालाजीचे सुंदर ध्यान हो
शिरडीच माझी असे पंढरी
साईबाबा पंढरीनाथ हो
नाथांचा तो नाथ माझा शिरडीचा साईनाथ हो

श्रीपाद वल्लभ दिगंबराचे मूर्तिमंत
ते रूप साजिरे साक्षात् साईनाथ हो
ब्रह्मा विष्णु महेश अवतरले एक मुखात हो
नाथांचा तो नाथ माझा शिरडीचा साईनाथ हो


■ **विवेक माळी**
परळ, भोईवाडा, मुंबई.

## हे मना....

हे मना सोडून दे
इकडे तिकडे भटकणे
नको आता कुणाच्या
मोहात अडकणे.

आत्म्यालाही लागली आहे
ओढ आता मुक्तीची
वाटही भेटली आहे
साईच्या भक्तीची

आत तुझ्या दडले आहे
पक्के धागे भक्तीचे
ताड्ताड् तोडून टाक
कच्चे धागे वासनेचे.



हे मना आता तरी
नकोस होऊ अंध
मुक्तीसाठी लावून टाक
साईनामाचा छंद
हे मना.... हे मना....

नको मनात द्वंद्व
एकदाचा स्वतःला करून टाक
साईभक्तीत बंद.

■ **अविनाश पौनीकर**
मु.पो. वाढोणा, ता. नागभीड,
जि. चंद्रपूर.

## देवी अंबिका ठाई ठाई

देवी अंबिका ठाई ठाई
महालक्ष्मी माझी आई !

देवशक्ती तू मायभवानी कोलासूर मर्दिनी
दीनदयाळू वरद रूपिनी भक्ता सुखदायिनी
तव पदामृताचे तीर्थ होऊनी पंचगंगा येई !

आदिमाय तू आदिशक्ती त्रिभूवनाची जननी
भक्तीमुक्ती द्या क्षमा तू तूच नारायणी
तुझ्यामुळे हे विश्व उदेले महिमा वर्णू काई ?

जय जय पद्मा, जय जय कमला,
जय जय तू मंगला
दयासिंधू तू सौख्यदायिनी आशीर्वाद दे मला
भक्तावर नीत दया असावी संसार तारूनी नेई !

■ **श्रीकांत नरूले**
खरी कॉर्नर, कोल्हापूर.

## नामस्मरण

जळो हृदय माझे जळो शरीरकाया।
नामाविन जीवन घालवतोस का वाया।

मुखी नाम घेता श्रीहरीचे घेतो जीवन प्रबंध।
नाम आर्त उठतो आनंदे विद्याधर घेतसे धुंद

जळो मदमत्सर जळो सर्व अहंकार।
षड्रिपुंचे घेईल दमन जडो नाम विकार।

अखंड नाम घेता चराचरी रक्षिला तो ईश्वर।
नामस्मरणाच्या उच्चाराने होईल मानव साक्षर॥

नामस्मरण घेता मुक्ती होईल जन्म कल्पतरू
श्रीहरीच्या नामोच्चाराने सुटतील शरीरविकारू

नामाची कास धरता आधारेल तो महामेरू
नामानेच तारला सांगुनी माऊली ज्ञानेश्वर

■ विद्याधर रिसबूड
डोंबिवली.

## प्रभु

प्रभुंचा स्वाद आहे।
प्रभुंचा आस्वाद आहे।
प्रभुंच्या चरणींचं सहवास आहे।
सर्वस्वाचा सर्वस्वाचा राम॥

परमश्री सद्‌गुरू प्रभु॥

■ प्रभाकर सदावर्ते
मंत्री पार्क, कोथरूड,
पुणे.

## एक स्वप्न

देव आहे माझा माझाचि राहील
आता ना मात्र तो कुणाचा होईल

जप-तपामाजी जन्म माझा गेला
देव नाही आला राही मी भुकेला
वाटे यावे त्याने दर्शन म्या घावे
दर्शने तयाच्या कृतार्थ मी व्हावे

श्रद्धा सबुरी मंत्र हा मानवास
साईनाथे दिधला मज विश्वास
भक्तिदीप हाती घेऊनि शोधिला
साई नाम-स्मरणे दाही दिशेला

साईच्या उक्तिचा प्रत्यय तो आला
विठ्ठला जेव्हा मी समोरी पाहिला
धरिले म्या दृढ तयाच्या पदांना
सोडणार नाही आता मी तयांना

■ ग. म. कुलकर्णी
जवाहर नगर, जयपूर.

## सुख-दुःख एक जाणीव

सुख-दुःख म्हणजे
हरेक जीवाच्या
वाटेला येणारी
एक जाणीव!

दुसऱ्याच्या सुखाने
कष्टी व्हाल
तर जळत रहाल
स्वतःच्याच दुःखात -

दुसऱ्याच्या दुःखात
सहभागी व्हाल
तर आनंद सुख
मिळवाल हृदयस्थ -

नि - 'मीपणा' विसरून
सुख-दुःखाच्या जाणीवेंत
जो स्थिर राहिला
तोच जिंकला या जीवनांत!

■ भालचंद्र केशव गन्द्रे
सुख निवास, चेंदणी, ठाणे (प).

## साई कशाला म्हणत्यात ?....

आता तरी अवतार घेशील काय ?
साई कशाला म्हणत्यात दावशील काय ? ॥धृ॥

जाती भेद वर्ण भेद पुन्हा चालले
राम रहिम बघ रस्त्यावर आले....
मतभेद त्यांचा तू हरशील काय ? ॥१॥

श्रीमंताच्या घरी सजे आज दिवाळी
दीन दुःखीतांवर कशी वेळ आली....
पणतीत पाणी भरून, दिवा लावशील काय.... ॥२॥

जिथे तिथे अंधश्रद्धा जन्म घेते
भगवं पांघरूनी कुणी सोंग आणते....
वाट चुकल्यांना वाट दावशील काय.... ॥३॥

स्वातंत्र्याच्या पन्नाशीची वर्षगाठ
देशप्रेमीयांची झाली पिछेहाट....
अनुसूत लेखणी उद्धरशील काय.... ॥४॥

■ दीपक रामचंद्र उदावंत
द्वारा शिक्षक कॉलनी, मौदा, नागपूर.



# शिरडीचा साईराजा

शिरडीचा तो साईराजा, सांगा कोणी पाहिला ?
राजांचाही राजा असुनी, फकीर होउनि राहिला ॥धृ०॥

लाखोपती, करोडपती
शिरडीला येऊनी,
प्रसादरूपीं भिक्षा मागति
याचकपण स्वीकारूनी
भक्तिभाव भक्तांचा पाहुनि, साई माझा तोषला ॥
॥ शिरडीचा तो साईराजा० ॥१॥

भाकर तुकडा झोळीमध्यें
भिक्षा मागुनि आणिली
चिमण्या, कुत्रीं, त्यातुनि खाती
साईमूर्ती हांसली।
शेष राहिला, श्रीबाबांनी घांस मुखीं तो लोटला ॥
॥ शिरडीचा तो साईराजा० ॥२॥

अंगावरती कधी न वस्त्रें
हौसेसाठी लपेटली
चिंध्याचिंध्या होउनि कफनी
जागोजागीं फाटली
तरीही साई शतशत रुपये रोजी वाटत राहिला ॥
॥ शिरडीचा तो साईराजा० ॥३॥

जस्ताचे टमरेल आणिक
खापराची टाटली
मडकें, पणती, चिलीम इतुकी
दौलत ज्याची साठली।
ऐशा अवलियाच्या नादीं, जो तो कां हो लागला ?
॥ शिरडीचा तो साईराजा० ॥४॥

वैराग्याची, दयाक्षमेची
साईमूर्ती माउली
दग्ध अशा भवमार्गी झाली
भक्तांसाठी साउली
दास म्हणे, श्री साईचरणीं जीव हा माझा वाहिला ॥
॥ शिरडीचा तो साईराजा० ॥५॥

■ चंद्रकांत गडकरी
अजनी चौक, नागपूर.

❑❑❑

# साई अनुभव



## दक्षिणा पेटीत अगदी तेव्हढीच रक्कम निघाली !

श्री. बाबासाहेब दर्प हे कर्तबगार, कार्यकुशल, चोख वृत्तीचे व मनमिळावू स्वभावाचे म्हणून प्रशासकीय सेवेत मान्यता पावले होते. मुंबई सरकार व नंतरच्या महाराष्ट्र शासनात सचिव पातळीवरील उच्च पदावर प्रदीर्घ काळ कार्यरत राहिलेले आणि आळंदीच्या श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे त्यावेळचे अध्यक्ष श्री. एम्. आर. यारदी, आय्.सी.एस्. यांची खास मर्जी श्री. बाबासाहेबांवर होती. त्यांनी, नाशिक येथे कुंभमेळ्याच्या भव्य आयोजनात श्री. बाबासाहेबांनी केलेल्या भरीव कामगिरीचा आवर्जून उल्लेख केलेला आहे. मुंबई सरकारचे अर्थमंत्री व पुढे गुजरात शासनाचे मुख्यमंत्री श्री. जीवराज मेहता यांचाही नितांत विश्वास श्री. बाबासाहेब यांनी संपादन केला होता. श्री. जीवराज मेहता यांनी, त्यांना गुजरातमध्ये आय्.ए.एस्. म्हणून येण्यास आमंत्रित केले होते. परंतु, श्री. बाबासाहेब यांनी, सेवानिवृत्तीनंतरचे उर्वरित आयुष्य पुणे येथे स्थायिक होऊन घालविण्याचे निश्चित ठरविले असल्यामुळे, नाईलाजानेच त्यांना नकार द्यावा लागला व पुढे पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे डेप्युटी म्युनिसिपल कमिशनर म्हणून ते सेवानिवृत्त झाले. चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही शासकीय कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी ते सतत मार्गदर्शन करीत असत. कितीही अनावस्था प्रसंग ओढवला, कितीही घोर संकट उभं राहिलं, तरी ते बिल्कुल विचलित होत नसत, एवढी त्यांची श्री दत्तावरील, श्री साईबाबांवरील भक्ती दृढ होती. शिरडीच्या श्री साईबाबा संस्थानच्या पहिल्याच विश्वस्त मंडळात (१९५४ ते १९८१) ते विश्वस्त होते.

अलिकडेच २६ ऑक्टोबर, १९९८ रोजी सायंकाळी वयाच्या ९२व्या वर्षी पुणे येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांचे चालता-बोलता देहावसान झाले. श्री. म. पां. वाळिंबे यांनी त्यांच्याविषयी लिहिलेला पुढील लेख सादर करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

माझे श्वशुर कै. श्री. रा. बाबासाहेब दर्प हे महानगरपालिकेतून निवृत्त झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे विश्वस्त म्हणून श्री साईबाबांच्या सेवेचा योग त्यांना आला. या योगायोगाचा थोडा पूर्वेतिहास विशद केल्यास ते अस्थानी, अनावश्यक होणार नाही, असे वाटते.

श्री. बाबासाहेब पुणे महानगरपालिकेतून निवृत्त होण्यापूर्वीच्या काळात श्री साईबाबांच्या शिरडीत एक घटना घडली....

एक तोतया साईबाबा प्रगट झाले आणि त्यांनी आपल्या निकटवर्तीयांच्या मदतीने भाविकांच्या भोळेपणाचा आणि श्री बाबांवरील श्रद्धेचा गैरफायदा घेऊन घोर फसवणूक करून लाखो रुपयांस लुबाडले. श्री साईबाबा प्रत्यक्ष आपल्या रूपाने प्रगट झाले असून भक्तांच्या दर्शनासाठी आणि कल्याणासाठी बाबा प्रगट झाले आहेत, असे भासविले. लेंडीबागेत दर्शन देण्यासाठी जागा निवडली. हा फसवणुकीचा प्रकार बरेच दिवस चालला होता. परंतु, सत्य हे अखेर उघडकीस येतेच ! लाखो रुपयांची घोर फसवणूक केल्यानंतर कालावधीने सदर तोतयाची लबाडी उघडकीस आली. त्यास व त्याच्या साथीदारांना अटक करण्यात आली आणि रीतसर गुन्हा दाखल करून अहमदनगर येथील न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली.

कै. यशवंतरावजी चव्हाण त्यावेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते. महसूल खात्यातील एक कर्तबगार, निर्भिड, अनुभवी आणि कायद्याचे ज्ञान असणारे म्हणून, सर्व दृष्टीने योग्य व्यक्ती म्हणून आमच्या श्वशुरांची चौकशी अधिकारी (कोर्ट रिसिव्हर) करिता शिफारस करून नियुक्ती करण्यात आली. पुढे सदर खटला कोर्टात सुरू होऊन निर्णय देण्यात आला आणि तोतया साईबाबा व त्याच्या साथीदारांना शिक्षाही झाली.... योगायोगाने म्हणा किंवा श्री साईबाबांच्या कृपेनेच विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान, शिरडी, म्हणून त्यांची नियुक्ती झाली. पुढे बरीच वर्षे श्री. बाबासाहेबांना श्री साईबाबांच्या सेवेची संधी मिळाली. श्री. बाबासाहेबांच्या घराण्यात श्री दत्तउपासना वर्षानुवर्षे अव्याहत चालू आहे.

श्री साईबाबांचे चरित्र आम्हाला परिचित होते. परंतु सिद्ध पुरुषांचे, भक्तांना आलेले अनुभव जाणून घेण्याची नेहमीच उत्सुकता असते. श्री. बाबासाहेबांनाही या संदर्भात काही अनुभव आले असतील तर त्यांना विचारावे, असे मनात होते. परंतु श्री. बाबासाहेबांचा स्वभाव असा की, त्यांनी, नोकरीच्या कारकिर्दीत व श्री साईबाबा संस्थान, शिरडी येथे सेवेत असतानादेखील आम्हाला कामाविषयी किंवा काही घडलेले प्रसंग सांगितले नाहीत. परंतु, विश्वस्त म्हणून सेवानिवृत्त झाल्यानंतर मात्र आमची, विशेषत: माझी उत्सुकता जागृत झाली आणि श्री. बाबासाहेबांना विचारण्याचे धाडस मी केलेच !

''श्री साईबाबांच्या सेवेत असताना (विश्वस्त म्हणून) आपल्याला काही असामान्य अनुभव आले काय ? अशी एखादी घटना घडली असल्यास आम्हाला सांगावी'', मी विनंती केली.

श्री. बाबासाहेब म्हणाले,

''होय ! एक घटना घडली, ती सांगतो....''

''श्री साईबाबा संस्थान, शिरडीतर्फे शिरडीत एखादे रुग्णालय उभारावे, अशी योजना पुढे आली. रुग्णालयासाठी शिरडीमध्येच एक जमीन (प्लॉट) निवडला व तो योग्य किंमतीवर खरेदी करण्याचे ठरले. खरेदी-किंमतही ठरविण्यात आली. संस्थानच्या खात्यामधून खरेदीची रक्कम अदा करून व्यवहार पूर्ण करावा, असे विश्वस्त मंडळींचे मत पडले. श्री. बाबासाहेबांनी विश्वस्त म्हणून काम पहाण्यास सुरुवात केली तेव्हापासून श्री साईबाबांपुढील देणगी-पेट्या दर महिन्याच्या पाच तारखेस इतर विश्वस्त आणि अन्य सदस्यांच्या उपस्थितीत उघडून रक्कम संस्थानच्या खात्यात जमा करावी, अशी प्रथा सुरू झाली होती. या प्रथेप्रमाणे पाच तारखेस पेट्या उघडाव्यात व त्यातून मिळणारी रक्कम खरेदी व्यवहारासाठी कमी पडत असल्यास संस्थानच्या खात्यातून कमी पडणारी रक्कम काढून व्यवहार पूर्ण करावा, असे श्री. बाबासाहेबांनी सुचविले. इतर सदस्यांनी या सूचनेस अनुमोदन दिले. ठरल्याप्रमाणे पाच तारखेस श्री साईबाबांपुढील देणगी-पेट्या उघडण्यात आल्या आणि काय आश्चर्य ! पेट्यांतून निघालेली रक्कम खरेदी-व्यवहारासाठी लागणाऱ्या रकमेइतकीच निघाली, कमी नाही किंवा जास्त नाही (रजिस्ट्रेशनसाठी लागणाऱ्या खर्चासह). आपण यास योगायोग (Co-incidence) म्हणा

किंवा श्री साईबाबांनीच व्यवस्था केली म्हणा, घटना घडली खरी ! (सध्या ते रुग्णालय जनसेवेसाठी सज्ज आहे. श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे तत्कालीन विश्वस्त या घटनेची सत्यता सांगतील.)

या सत्यघटनेवरून श्री साईबाबांचे वास्तव्य निरंतर सर्वत्र आहे आणि जनतेच्या सेवाभावी संस्थांना, व्यक्तींना त्यांचा आशीर्वाद नेहमीच आहे, याची प्रचिती येत नाही काय ?

**चावडीत गुप्तरूप। मशिदीत ब्रह्मरूप।**
**समाधित समाधि स्वरूप। सुखस्वरूप सर्वत्र ॥**
**असो सांप्रत हाच विश्वास। भक्ति धरावी निजजीवास।**
**भंग नाही समर्थ साईस। अक्षय रहिवास अखंड ॥**

प्रस्तुती : **म. पां. वाळिंबे,** सातारा.

## साईसान्निध्य

**मी** 'नुकतीच बी.ई. (इलेक्ट्रॉनिक्स) झाले होते. त्याचवेळी सर्वत्र इंडस्ट्रियल स्लॅक सुरू असल्याने नोकरी मिळत नव्हती. सर्वत्र अर्ज करून मी थकून गेले होते. पण माझे मन मानायला तयार नव्हते. मला एकदा तर पुण्याला जाऊन नोकरीसाठी स्वतः फिरायचे होते. असे दोन महिने गेले असता शेवटी पुण्याला जायचा योग आला.

पुण्याला मी नोकरी शोधण्यासाठी जाऊन पोहोचले. पण मला वाटते, साईबाबांची इच्छा होती की, मी पुढे शिकावे, नोकरी करू नये. त्यामुळेच की काय, मी पुण्याहून, नोकरीसाठी प्रयत्न करायचा सोडून, सी-डॅकच्या कॉम्प्युटर कोर्सच्या परीक्षेचा फॉर्म घेऊन आले.

परीक्षा होती २३ नोव्हेंबरला. पण कोल्हापूरला परत आल्याबरोबर सप्टेंबरमध्ये मी अभ्यास सुरू केला. या परीक्षेला पूर्ण भारतातून मुले बसतात व जागा अगदीच कमी असल्याने मानसिक तणाव खूप होता.

श्री बाबांचे स्मरण करून मी धीराने अभ्यास सुरू ठेवला. शेवटी एकदा २३ नोव्हेंबरला परीक्षा झाली. परीक्षेचा निकाल ८ डिसेंबरपर्यंत येणार होता. बाबांवर दृढ विश्वास होता म्हणून निकाल येईल याची खात्रीपण होती, तरीही मानसिक ताण वाढतच राहिला.

शेवटी मी कोल्हापूरच्या साईबाबा मंदिरात गेले. ही गोष्ट आहे ३ डिसेंबर, संध्याकाळी ७ वाजता घडलेली. मी व माझी बहीण गौरी मंदिरात जाऊन बसलो. मी मनातल्या मनात साईबाबांना रिझल्टविषयी प्रार्थना करीत होते. तेवढ्यात मंदिरातील पुजारी आले व त्यांनी मला ४ बोरे दिली. क्षणभर मला आश्चर्य वाटले की, त्यांनी मला बोरे कशी दिली ? पण तेवढ्यात माझी बहीण म्हणाली, ''बघ ताई, ही चार बोरे म्हणजे सी-डॅक (CDAC) या चार अक्षरांचे प्रतीक आहेत.... आणि ही घटना तुझ्या रिझल्टचा संकेत आहे.''

आणि माझ्या बाबांची कृपा की, दुसऱ्या दिवशी ४ डिसेंबरला, म्हणजे शनिवारी, दु. ४.०० वाजता माझा रिझल्ट आला. मी प्रवेश परीक्षा पास झाले व मला कोर्ससाठी 'ठाणे' हे सेंटर मिळाले. आज मला अतिशय आनंद वाटतो आहे की, मी अशा ठिकाणी आहे, जेथे वर्तकनगर येथे साईबाबांचे मंदिर आहे, साइभक्तीचा दरवळ आहे.

ठाणे शहर जरी मला परके असले तरी पावलोपावली माझे साईबाबा मला धीर देत आहेत, माझी सोबत करीत आहेत. मी सर्व बाबांच्या मुलांना एवढेच सांगू इच्छिते की, बाबांनी सांगितलेल्या 'श्रद्धा व सबुरी' या मार्गावरच चला ! साईबाबा सदैव तुमच्या पाठीशी उभे आहेत.

**– कु. विजया वि. माने**
कोल्हापूर.

## शिरडीदर्शन

**ए**क दिवस यांचे मित्र आपल्या पत्नी-मुलांसह व आम्ही दोघं, आमच्या छोट्या नातवासह, शिरडीला गर्दी नसेल अशी वेळ साधून निघालो. यांच्या मित्राने व यांनी तीन दिवस रजा घेतली होती. त्यामुळे तिसऱ्या दिवशी दुपारच्या बसने परतायचे, असे ठरवले होते.

जून महिना असल्यामुळे अर्ध्या वाटेवरच पावसाने आम्हाला गाठले. शिरडीला जाण्याचा बेत जेव्हा यांनी मला सांगितला तेव्हा, ''अशा पावसाळ्यातच कशाला जायचे

ठरवले, नंतर पुढे केव्हातरी जाऊया'', म्हणून मी मोडता घातला होता. पण पुढे ''केव्हातरी'' यांच्या व त्यांच्या मित्राच्या, दोघांच्याही रजेचे, एकाचवेळी, जमण्यासारखे नव्हते; म्हणून आलेली संधी घालवायला हे तयार नव्हते. उलट मला म्हणाले, ''पावसाळ्यात घाटातली मजा काय सुंदर, अवर्णनीय असते, ते पहाच तू एकदा! पावसाची मस्त शोभा पाहात पाहात जाऊ!''

पावसामुळे वातावरणात सुखावह असा गारवा निर्माण झाला होता. हळूहळू पावसाला जोर चढला. डोंगर-कपारींतून धो-धो पावसाच्या पाण्याचे लोट खाली कोसळत होते. एकूण पावसाचे ते रौद्ररूप भयावह वाटत होते. घाटात काही वाहनें घसरून पडली होती. काही मालवाहू ट्रक्स उलटे होऊन पडले होते. रस्त्याच्या कडेला एक जीप धाडधाड पेटत होती. ते सारे दृष्य पाहून माझ्या तर तोंडचे पाणीच पळाले. माझी यांच्यामागे एकच भुणभुण सुरू झाली.... तरी मी म्हणत होते, पावसाळ्यात प्रवास नको म्हणून! आपण कसे काय सुरक्षितपणे शिरडीला जाऊन पोहचू, या काळजीने छोट्या नातवाला कुशीत घेऊन, मी देवाचे नामस्मरण करीत, भयभीत होऊन, तुफान पावसाचे थैमान पाहत होते. तसा आमचा एकूण प्रवास सुखरूपपणे व्यवस्थित चालला होता. शिरडी जवळ आली. बाबांच्या मंदिराचा कळस दिसू लागला. मनोभावे मंदिराला नमस्कार केला. बसमध्ये यांनी आम्हाला सूचना दिल्या की, बसस्टॉपवर उतरल्यावर, मागून तुम्ही सामान घेऊन या, मी शक्यतोवर देवळासमोरच उतरून आपल्या जागेकरिता नंबर लावतो. यांची खात्री होती की, आता शाळा, कॉलेज चालू आहेत, म्हणजे गर्दी नसणार, सहज जागा मिळेल; तरीपण जरा तत्परतेने ऑफिसजवळ लौकर जाऊन नंबर लावलेला बरा. आमची बस मंदिरासमोर येताच क्षणभर उभी राहिली. तेवढ्यात संधी साधून यांनी बसमधून खाली उडी मारून उतरण्यात यश मिळवले.

इतक्यात इतका वेळ थांबलेला पाऊस, विजांचा चमचमाट व ढगांच्या गडगडाटासह घनघोर बरसू लागला. सगळीकडे चिखल आणि निसरडे झाले होते. आम्ही कसेबसे चिखल तुडवीत, भिजत आरक्षण ऑफिसजवळ आलो. यांची धावपळ चालली होती. यांनी चौकशी केली; पण आरक्षण क्लार्कने सांगितले, सर्व जागा भरून गेल्या आहेत. मेन हॉलमध्येही



लॉकर मिळू शकला नाही. यांचे तोंड पार उतरून गेले. आरक्षण क्लार्कने सांगितले की, तुम्हाला 'भक्त निवास'मध्ये भाड्याने बिछाने घेऊन गॅलरीत झोपावे लागेल. हे म्हणाले, ''मी एकदोन वेळा ऐन थंडीत भक्तनिवासच्या गॅलरीत झोपलो होतो. पण त्यावेळी मी एकटाच होतो, पण आज आम्ही आमच्या नातवासह आणि मोठ्या कौतुकाने बाबांच्या भेटीसाठी आमच्या भरंवशावर आलेला माझा मित्र त्याच्या पत्नी-मुलीसह....'' बाहेर तुफान वारा-पाऊस चालू होता. वेळ रात्रीची, पण जागाच नाही म्हटल्यावर नाईलाज होता. भक्तनिवासची गॅलरी कोणत्या माळ्यावर रिकामी आहे ते पाहाण्यासाठी 'हे' गेले, तर काय, सर्व गॅलऱ्या भिजून चिंब. काही लोक त्या भिजलेल्या गॅलरीत, भिंतीच्या कडेला अंगाचे मुटकुळे करून बसले होते. गॅलरीच काय, पण जिन्यावरच लोकांनी आपल्या पथाऱ्या टाकून ते अवघडून झोपले होते.

आम्हाला काही सुचेना. किती हौसेने हे त्यांच्या मित्राला आमच्या सोबत घेऊन आले होते. तोही प्रथमच शिरडीला येत

होता. आमच्या आनंदावर विरजण पडले. आम्ही सर्वजण भिजून चिंब झालो होतो. पावसामुळे सारीकडे चिकचिकाट झाला होता. भक्तजनांची एकच गर्दी व दाटीवाटी झाली होती. ओल्या अंगाने आम्ही व मुले थरथर कापत होतो. आम्हाला कपडे बदलायला तरी कुठे आडोसा हवा होता, पण टिचभरही कुठे जागा शिल्लक नव्हती. मी मनात ठरवले की, आता यापुढे कुणालाही बरोबर घेऊन शिरडीला यायचे नाही. यांचा मित्र म्हणाला, ''चला लौकर, आपल्या जागेवर जाऊन प्रथम कपडे बदलून घेऊ, गारठून दांतखीळ बसायची वेळ आली आहे.'' हे काळजीच्या स्वरांत म्हणाले, ''कुठली जागा नी कुठले काय ? दर्शन घेऊन तसेच माघारी फिरायची वेळ आली आहे. अहो, कुठेच जागा शिल्लक नाही. काय करायचे ?''

हे सुन्न मनाने, ऑफिससमोर उभे होते. बाजूला आम्ही पाण्याने निथळत, थंडीने कुडकुडत बधीर मनाने खिन्न होऊन उभे होतो. इतक्यात एक १२/१३ वर्षांचा मुलगा जवळ आला व 'यांना' म्हणाला, ''साहेब, जागा हवी का ? चला लौकर, माझ्यामागे या.'' आम्ही आमचे सामान उचलून त्याच्या मागेमागे जाऊ लागलो. मनात विचार आला की, आला हा मुलगा एखादी खाजगी जागा दाखवणार. पण त्याने आम्हाला घेऊन थेट साईबाबांच्या मंदिराच्या पायऱ्या चढायला सुरुवात केली. जिना चढून वर गेलो, त्याने कुलूप काढून एक खोली उघडून दिली, अगदी रिकामी आणि म्हणाला, कदाचित कुणी भक्तमंडळी आलीच तर तुमच्या खोलीत त्यांना सामावून घ्या ! जरूर, जरूर, 'हे' आनंदातिशयाने म्हणाले, मनोमन आम्ही साईबाबांना हात जोडले. आमची उत्तम सोय बाबांनी केली होती. यांनी भराभर गाद्या मागवून घेतल्या. आम्ही कपडे बदलले. मन पूर्ण निश्चिंत व समाधानी झाले. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन. त्या दिवसाचे बाबांचे दर्शन, शेजारती झाली. झोपल्या झोपल्या मी हात जोडले, म्हटले, ''बाबा, तुझी लीला अगाध आहे !''

**– सौ. आशालता सावे**
पालघर, ठाणे.

## एका विद्यार्थ्यांचा साईअनुभव

दहावीमध्ये ८८.५७% मार्क्स मिळाल्यानंतर मी माटुंग्याच्या आर. ए. पोदार कॉलेजमध्ये कॉमर्ससाठी प्रवेश घेतला. बारावीत ७७.१७% मार्क्स मिळाले. प्रथम वर्ष वाणिज्य (F.Y.B.Com.)लासुद्धा फर्स्टक्लास मिळाला. साईबाबांच्या आशीर्वादाने माझी अजूनपर्यंतची शैक्षणिक कामगिरी चांगली होत होती. पण द्वितीय वर्ष वाणिज्य (S.Y.B.Com.)चा रिझल्ट जाहीर झाला आणि मी मोठ्या मोठ्या अपयशाला सामोरे गेलो....

द्वितीय वर्ष वाणिज्य (S.Y.B.Com.)ला असलेल्या एकूण सहा विषयांपैकी 'बिझनेस लॉ' (Business Law) मध्ये मला १०० पैकी २० गुण मिळून मी त्या विषयात नापास झालो. याचाच अर्थ असा की, त्या एका विषयात मला A.T.K.T. लागली. म्हणजेच, पुढच्या वर्गाचा, म्हणजे तृतीय वर्ष वाणिज्य (T.Y.B.Com.) मध्ये मला या वर्षाचा अभ्यास करतानाच मागील वर्षाचा एक विषय सोडवावयाचा होता. प्रश्न एवढ्यावरच संपणार नव्हता. आमच्या कॉलेजमध्ये द्वितीय वर्षाचे (S.Y.B.Com.) मार्क्स विचारात घेऊनच मुलांना ऐच्छिक विषय (Optional Subjects) दिले जातात. माझे द्वितीय वर्षाचे मार्क्स A.T.K.T. लागल्यामुळे अगदीच दयनीय होते. त्यामुळेच मला Export आणि Industrial & Organisational Psychology (I.P.) हे 'ऐच्छिक' विषय (Optional Subjects) 'इच्छा' नसताना घ्यावेच लागले. जे विद्यार्थी B.Com.ला असतील त्यांना या दोन विषयांची कल्पना असेल. या विषयांमध्ये विद्यार्थी ७०-७५ पेक्षा जास्त मार्क्स मिळवू शकत नाहीत. साहजिकच विद्यार्थ्यांची टक्केवारी कमी होते.

माझी अशी दारुण अवस्था झाल्याबरोबर T.Y.B.Com. साठी कॉलेज सुरू होण्याअगोदर सुट्टीत साईबाबांच्या चरित्राचे सात दिवसांत पारायण केले; आणि बी.कॉम.च्या या शेवटच्या वर्षात मला पूर्वीसारखेच यश मिळावे, अशी प्रार्थना केली. पारायण पूर्ण झाल्यावर मी संपूर्ण वर्षभर साईकृपेचे छत्र अनुभवले, आणि

**जो मजलागी अनन्य शरण**
**विश्वास युक्त करी मद्भजन ।**
**माझे चिंतन माझे स्मरण ।**
**तयाचे उद्धरण ब्रीद माझे ॥**

या उक्तीचा वारंवार प्रत्यय घेतला.

T.Y.B.Com. साठी कॉलेज सुरू झाले आणि एक नोटीस निघाली.... ज्या विद्यार्थ्यांना आपले २ पैकी फक्त एकच ऐच्छिक विषय (Optional Subjects) बदलून घ्यायचा असेल त्यांनी अर्ज करावेत. लगेच मीसुद्धा अर्ज दिला की Export हा विषय बदलून मला Computer Systems हा विषय देण्यात यावा; आणि आठ दिवसांतच मला सकारात्मक उत्तर मिळाले. Computer Systems हा एक असा विषय आहे की, ज्याच्यात विद्यार्थी १०० पैकी १०० मार्क्ससुद्धा मिळवू शकतो. अशाप्रकारे बाबांनी मला दिलेला हा कृपाप्रसाद भविष्यातल्या यशाची खात्री देणाराच ठरला.

आता कॉलेजमधून तर एक scoring विषय मिळाला. पण त्यासाठी मला हवा तो क्लास मिळेना. सगळ्या क्लासेसच्या ॲडमिशन्स फुल झाल्या होत्या. माझ्या घराजवळच असलेल्या Computerच्या क्लासेसमध्ये मी चौकशीला गेलो. तिथेही मला प्रवेश मिळेना. तिथल्या प्रमुख सरांनासुद्धा भेटलो. तरीही काही उपयोग झाला नाही. परत दोन दिवसांनी त्याच सरांना गाठले, तेव्हा त्यांनी माझ्या हातात ॲडमिशन फॉर्मच दिला; आणि मला प्रवेश दिला गेला.

बाबांनी माझ्यावर एवढी कृपा केल्यावर मीसुद्धा मेहनतीला सुरूवात केली. सर्वात प्रथम मागच्या वर्षी राहिलेला विषय १०० पैकी ६० मार्क्स मिळवून ऑक्टोबरमध्ये सोडवला. रात्रंदिवस झटून अभ्यास केला. कॉलेजमध्ये I.P.च्या सगळ्या लेक्चर्सना उपस्थित राहू लागलो. अकाउंट्सचे तीनही पेपर्स आणि Computers या विषयांचा विशेष अभ्यास केला. या प्रयत्नांना आई, बाबा, सर आणि मुख्य म्हणजे, बाबा या सर्वांच्या आशीर्वादाची जोड होतीच.

१७ एप्रिल, १९९८ ला बी.कॉमची परीक्षा सुरू झाली. २० एप्रिल, म्हणजे सोमवारी, A/cs-Paper III चा पेपर होता. ३६ मार्कांचा पेपर सोडवून झाला आणि मला चक्कर यायला लागली, डोळ्यांसमोर काळोखी यायला लागली.... आणि परत एकदा साईकृपेने दहा मिनिटांतच मी पूर्वस्थितीत आलो आणि पेपर लिहू लागलो.

३० जूनला बी.कॉम.चा रिझल्ट जाहीर झाला आणि मागच्या वर्षी आलेल्या अपयशाचे डाग धुवून टाकणारे धवल यश मला बाबांनी मिळवून दिले. मला बी.कॉम.ला ७५.२९%



मार्क्स मिळाले. ज्या क्लासमध्ये मला ॲडमिशन फुल झाल्यामुळे प्रवेश नाकारण्यात येत होता त्या क्लासमध्ये Computers या विषयांत १०० पैकी ९५ मार्क्स मिळवून पहिल्या दहांत आलो. ज्या पेपरच्या दिवशी मला चक्कर येत होती त्या A/cs-Paper III मध्ये १०० पैकी ९४ मार्क्स मिळाले. केवळ बाबांमुळेच आणि आईबाबांच्या, सरांच्या आशीर्वादाने मला पुन्हा एकदा यश मिळाले.

माझ्या जीवनाला आकार देणाऱ्या आणि आत्मविश्वास देणाऱ्या श्री बाबांच्या चरणी माझे मस्तक शेवटपर्यंत लीन राहू दे, हीच प्रार्थना !

**– साईकिरण, मुंबई.**

## बाबा हाकेला धावले !

गुरूवार, दि. १९/३/९८ रोजी माझे शेजारी श्री. दिलीप पाटील (साईभक्त) यांच्यासोबत पिंगुळी, ता. कुडाळ येथील हायवेवरील श्री साईमंदिरात

सायंकाळी आरती कार्यक्रमास उपस्थित झालो. आरती संपल्यावर तीर्थप्रसाद झाल्यावर - मंदिराचे व्यवस्थापक वयोवृद्ध श्री. बाबा वाडकर यांना कोकणातील प्रथेप्रमाणे साईचरणी गाऱ्हाणे घालण्यास सांगितले. त्यांनी गाऱ्हाणे घालून - बाबांची - साईचरणउदी मस्तकाला लावून, ''खुशाल जा, बाबा समर्थ आहेत !'' असे सांगितले. त्यामुळे मी धीट झालो; व घरी आलो. तद्नंतर माझा मानसपुत्र, नेत्रतज्ञ-शस्त्रक्रियातज्ज्ञ डॉ. कुंभार यांच्या दवाखान्यात मला घेऊन जाण्यासाठी रिक्षा घेऊनं आला; व मी डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी दवाखान्यात दाखल झालो.

दि. २०/३/९८ रोजी डॉ. महोदयांनी माझे डोळे तपासून, दि. २१/३/९८ला शस्त्रक्रियेसाठी या, असा संदेश दिला. त्याप्रमाणे दि. २१/३ रोजी सायंकाळी एका खाजगी रूग्णालयात मला दाखल केले. माझे कुटुंब आजारीपणामुळे परावलंबी व परस्वाधीन, त्यामुळे दवाखान्यात सोबतीची अत्यंत जरूरी होती. बाबांच्या कृपेने माझे स्नेही श्री. दिलीप पाटील यांनी माझ्या सोबत येऊन सतत तीन दिवस अहोरात्र राहून निःस्वार्थ बुद्धीने मनोमन सहकार्य केले; इतकेच नव्हे, तर ते माझ्यापेक्षा वयाने लहान असूनही मला साईबाबांचे सतत नामस्मरण करण्यास बजावीत होते.

दि. २२/३/९८ रोजी संध्या ६ वा. नंतर ऑपरेशन होते. पण साधारण दुपारपासूनच छातीत धडधड होत होती. श्री. दिलीप पाटील सतत धीर देऊन, साईबाबांचे नामस्मरण करा, असे सांगत.... सायंकाळी मला टेबलवर नेण्यात आले. टेबलावर झोपलो, पण छाती जास्त धडधडू लागली. मनातल्या मनात जोरजोराने साईचा धावा व मुखाने साईनामस्मरण चालू होते. तोच बाबांच्या रूपात डॉ. महाशयांनी माझ्या छातीवर हात फिरवून धीर दिला व बोलण्यात गुंगवून हळूवारपणे आपल्या कामाला प्रारंभ केला. डॉक्टरांची कुशलता वाखाणण्यासारखी.... त्यांनी तब्बल ४५ मिनिटे आपले काम करून डोळ्यांना लेन्स बसविली. कसलीच जाणीव झाली नाही, मनाने आणि अंतर्मनानेही समाधानाचा सुस्कार सोडला, कसालाही त्रास नाही.... धडधडणीही दूर झाली. ऑपरेशन पार पडले, हसतमुखाने. ऑपरेशन रूममधून बाहेर आलो. येतायेता डॉ. महोदयांच्या चरणांस स्पर्श करून, श्री प. पू. साईबाबा समजून, नमस्कार करण्याचा प्रयत्न केला; पण डॉक्टरांनी मला वरचेवर उचलून धीर दिला व म्हणाले, ''प. पू. साईबाबा तुमचं कल्याण करतील.''

दिनांक ३/५/९८ रोजी डोळ्यांचे टाके काढून मला डॉ. महोदयांनी दृष्टी दिली. वयाच्या ७८-७९ वर्षी मी आता पूर्वीसारखा स्वतःहून हिंडू-फिरू शकतो, वर्तमानपत्र वाचतो, पत्रव्यवहार करतो. साईबाबांची कृपादृष्टी झाल्यामुळेच मला हे नवे दर्शनीय भाग्य लाभले. आता, मी माझे शेजारी-नातेवाईकांसोबत साईमंदिरात आरतीला उपस्थित राहतो. साईबाबा हाकेला धावल्यामुळे.... माझी प्रकाशाकडे वाटचाल सुरू झाली.

**- गोविंद ना. तिनेकर**
मु.पो. पिंगुळी, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

## साक्षात् साईदर्शन !

निस्सीम भक्ती व अपार श्रद्धेने साक्षात् परमेश्वराचे दर्शन अनेकांना झाल्याची खूप उदाहरणे आहेत. आपल्या श्रद्धेने आपले आराध्य दैवत जेव्हा साक्षात् दर्शन देते, तो आनंद तर अमर्याद आहेच, त्याबरोबरच जन्माचे सार्थक झाल्याचे समाधानही लाभते.

मी आपणास कथन करीत असलेला अनुभवदेखील त्याच संदर्भातला आहे. श्री साईबाबांवर माझी अपार श्रद्धा असल्यामुळे त्यांचीच भक्ती हा एकच नेम आहे. श्री बाबांची भक्ती करीत असताना मनात एक ध्यास लागलेला असे की, आपल्या आयुष्यात एकदा तरी प्रत्यक्षात श्री बाबांचे दर्शन घडावे. त्याचाच परिपाक की काय, मला साक्षात् दर्शनाचा कृपाप्रसाद लाभला आणि मी कृतकृत्य झालो.

नित्यनियमाप्रमाणे मागील वर्षी ८ सप्टेंबर रोजी मी सहकुटुंब व मित्रपरिवारासह श्री बाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन परतीचा प्रवास करीत होतो. समाधीच्या दर्शनानंतरची स्थिती तर कल्पनातीत असते, जणू आपली संपूर्ण जीवननौका बाबा स्वतःच चालवित असून आपण निश्चिंत झालेले असतो ! अशाच अवस्थेत आम्ही नाशिक-घोटीमार्गे



सायंकाळी साडेसहाच्या सुमारास 'सुमो'मधून गप्पागोष्टी करीत प्रवास करीत होतो. नाशिक-मुंबई द्रुतमार्गावर सुमारे ३ ते ४ कि.मी. अंतर अगदी सरळ व त्यानंतर असलेले एक वळण आमच्या ड्रायव्हरने सफाईने कापले. बाहेरचे वातावरण अत्यंत प्रसन्न व आल्हाददायक होते.

काही क्षणांपूर्वीच तुरळक पाऊस पडून गेला होता, आणि त्यातच दिवस मोठा असल्यामुळे आजूबाजूच्या माळरानावर एकच नव्हे, तर दोन इंद्रधनुष्यें अवतरली होती. असे मंगलमय वातावरण सूचित करीत होते की, काहीतरी शुभ घडणार आहे! मनानेही पक्की खूणगाठ बांधली - हे सर्व शुभशकून आहेत. मागून येणारे आपापल्या वाहनांना थांबवून निवांतपणे हे मनोहारी दृश्य डोळ्यांत साठविण्याचा प्रयत्न करीत होते, तर काहीजण कॅमेरामध्ये कायमची आठवण म्हणून संकलित करीत होते; परंतु आम्हाला पनवेलला नऊपर्यंत पोहोचायचे असल्यामुळे आम्ही त्याचा आस्वाद चालत्या गाडीतूनच घेतला. आमचा कार्यक्रम आरेखित असल्यामुळे आमच्या गाडीचा वेगही ताशी ९० कि.मी.च्या आसपास होता.

बाहेरील ते नयनरम्य दृश्य आणि निसर्गाचा साक्षात्कार घेत असतानाच आमची गाडी एका छोट्या चढणीवर आली.... समोरच गोणपाटाने शिवलेली सुमारे ४' x ५' आकाराची झोपडी.... आणि त्या झोपडीवजा जागेमध्ये 'साक्षात् साईबाबा' विराजमान झाले होते. काय तो क्षण! बाबांच्या डोळ्यांतले तेज मी माझ्या नजरेने अनुभवीत होतो. त्या अलौकिक नेत्रातले भाव आणि माझी अपार श्रद्धा मला आठवण करून देवून गेली की, "मी सदैव तुझ्या पाठीशी आहे. कुठेही थांबू नकोस !" किती दिव्य संदेश मी आज अनुभवला! आणि श्री बाबांचे परमपावन दर्शन साक्षात् मला लाभले; इतकेच नव्हे, तर माझ्याबरोबरचे सर्वजण एकाचवेळी ओरडलेही, "ते पहा साईबाबा!" याचाच अर्थ असा की, श्री बाबांचे पावन दर्शन आम्हा सर्वांनाच झाले.

**- अरुण ठाकूर**
शिवाजी रोड, पनवेल.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## संस्थान प्रकाशित छायाचित्रांची यादी


| अ. क्र. | छायाचित्राचे नाव | आकार | मूल्य |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (कृष्णधवल) | १४'' X २०'' | - |
| २. | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४'' X २०'' | ०३.०० |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | पोस्टकार्ड | |
| ४. | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | ४'' X ३'' | ००.२५ |
| ५. | द्वारकामाई (रंगीत) | १४'' X २०'' | ०३.०० |
| ६. | द्वारकामाई (रंगीत) | १०'' X १४'' | ०२.०० |
| ७. | द्वारकामाई (रंगीत) | ७'' X १०'' | ०१.०० |
| ८. | द्वारकामाईत बसलेले बाबा | १४'' X २०'' | ०३.०० |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (रंगीत) | १०'' X १४'' | ०२.०० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (रंगीत) | ७'' X १०'' | ०१.०० |
| ११. | चेहरा फोटो (रंगीत) | पोस्टकार्ड | - |
| १२. | पालखी फोटो (रंगीत) | ७'' X १०'' | ०१.०० |
| १३. | मूर्ती फोटो (रंगीत) | १४'' X २०'' | ०३.०० |
| १४. | मूर्ती फोटो (रंगीत) | १०'' X १४'' | ०२.०० |
| १५. | मूर्ती फोटो (रंगीत) | ७'' X १०'' | ०१.०० |

**सूचना : कृपया सुधारित मूल्य व टपाल खर्चासाठी लिहावे.**

पुस्तके व छायाचित्रे खालील ठिकाणी उपलब्ध आहेत :

(१) कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी - ४२३ १०९, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर, महाराष्ट्र राज्य.

(२) 'साई निकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४.



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | - |
| ३३. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० |

**सूचना : कृपया सुधारित मूल्य व टपाल खर्चासाठी लिहावे.**

# साईभक्तांना आवाहन

प्रिय साईभक्तांनो !
सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकीत,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
'श्री साईलीला'

---------✂---------- इथे कापा ---------✂---------

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई - ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येक ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

(ता.क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

# दसरा उत्सव, शिरडी



उत्सवात श्री साईबाबांची पाद्यपूजा करताना संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर, त्यांची धर्मपत्नी, संस्थान सदस्य श्री. मोहन जयकर व संस्थान सदस्या श्रीमती रेखा दिघे.



दसरा उत्सवात होणारी विशेष आराधना विधि पूजा करताना संस्थानचे सदस्य श्री. प्रकाश कारखानीस व राजीव रोहोम.




उत्सवात एक दिवस श्री साईबाबांची पाद्यपूजा करताना संस्थान सदस्य श्री. संभाजी काळे व श्री. आप्पासाहेब कोते.



उत्सवात नगर प्रदक्षिणेसाठी निघालेल्या श्री साईबाबांच्या पालखीचे दृश्य.



श्री साईबाबांचा रथ व साईभक्तीत लीन भक्त.




उत्सवात, संस्थानद्वारा बांधण्यात येणाऱ्या तीन नव्या भवनांच्या बांधकामांचा भूमिपूजनसमारंभ संपन्न झाला. धर्मशाळा, संस्थानच्या अधिकारी सेवकवर्गाकरिता गृहप्रकल्प व साईनाथ रुग्णालयाचे विस्तारित भवन, अशा तीन भवनांच्या बांधकामांच्या भूमिपूजनप्रसंगांतील एक दृश्य.

छायाचित्र : नितीन मिराणे

Registered with the Registrar of News-Papers for India No. MH

# दसरा उत्सवातील विहंगम दृश्य





श्री द्वारकामाई मंडळ, मुंबईद्वारा शिरडीत दसरा उत्सवाच्या वेळी केलेली विद्युत रोषणाई.